महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
(शासन निर्णय क्रमांक - आरईएस१०.१००१/प्र.क्र.१२२/सेवा१ दिनांक -११/१२/२००१ )

# आरोग्य सहाय्यक (पु) यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी योजनेंतर्गत पुरुष आरोग्य सहाय्यकानी एकूण २०,००० लोकसंख्येला सेवा देणे अपेक्षित असून एकुण ४ उपकेंद्र व ४ आरोग्य कर्मचारी (पु) यांचे पर्यवेक्षण करणे बंधनकारक आहे.त्याच प्रमाणे प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम व कुष्ठरोग दूरीकरण कार्यक्रमांचे प्राथमिक आरोग्य सेवेत होणाऱ्या विलीनिकरण अनुषंगाने व इतर राष्ट्रीय कार्यक्रमात झालेला बदल लक्षांत घेता पुरुष आरोग्य सहाय्यकाच्याजबाबदाऱ्या खालील प्रमाणे आहेत.

## पर्यवेक्षण व मार्गदर्शन.

१) कार्यक्षेत्रांतील सर्व पुरुष आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कार्याचे संनियंत्रण, पर्यवेक्षण त्यांच्या कामाची आखणी व कौशल्यवृध्दीसाठी त्यांना मार्गदर्शन.
२) पर्यवेक्षणासाठी नियमित व अकस्मित भेटी.
३) वैद्यकिय अधिकारी,आरोग्य कर्मचारी व लाभार्थी याच्यांत आरोग्य सेवा संबंधाने योग्य समन्वय साधणे.
४) आरोग्य सहाय्यक (स्त्री)च्या सहाय्याने सर्व कर्मचाऱ्यांची सभा व कामाचा आढावा घेणे.
५) मसिक सभेत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा देणे.
६) आरोग्य सेवकाला साधनसामुग्रीचा पुरवठा.
७) आरोग्य सेवकाच्या नोंदवहया व दप्तर पडताळणी व मार्गदर्शन.
८) आरोग्य सेवकाकडून आलेल्या अहवालाचे एकत्रिकरण छाननी व अहवाल सादरीकरण.

**ब) साहित्य सामुग्री व्यवस्थापन [**

१) आरोग्य सहाय्यिकेसोबत नियमित व आकस्मिक उपकेंद्र साठा तपासणी.
२) साहित्य सामुग्रीचे मागणीपत्रक योग्य वेळी सादर करुन पुरवठा प्राप्त करणे.
३) उपकेंद्र औषधीसाठा व इतर साहित्याच्या योग्य साठवणुकिकडे नियमित लक्ष.
४) पुरुष आरोग्य कर्मचाऱ्याच्या किटची नियमित पडताळणी.

**क) संघकार्य**

१) पुरुष आरोग्य कर्मचाऱ्याना संघकार्य सुलभ करणे.
२) आरोग्य सहाय्यिका व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांसोबत कार्याचे समन्वय व गटपातळीवर आयोजित सभेत सहभाग.
३) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सभेत नियमित सहभाग.
४) कार्यक्षेत्रात विविध आरोग्य सेवांचे आयोजनासाठी वैद्यकिय अधिकाऱ्यांना मदत करणे.
५) इतर कर्मचाऱ्यांसह आरोग्य सेवा शिबीरांचे आयोजन व सहभाग.

**ड) अहवाल व नोंदी**

१) आवश्यक नोंदी व अहवाल तत्परतेने सादर करणे.
२) पुरुष आरोग्य कर्मचाऱ्यांकडून प्राप्त नोंदी व अहवालांचे योग्य संकलन करुन वैद्यकिय अधिकाऱ्यांना सादर करणे.

१) राष्ट्रीय हिवतांप प्रतिरोध कार्यक्रम.

- आरोग्य सेवकांच्या सर्वेक्षण भेटीचे नियोजन व पर्यवेक्षण
- घरभेटीत आढळलेल्या रुग्णाचे रक्तनमुने,गृहितोपचार,हिवतांप रुग्णांना समूळ उपचार.
- ताप उपचार केंद्र व गोळया वाटप केंद्र यांची पडताळणी
- किटकनाशक फवारणी कार्यक्रमावर देखरेख
- डास उत्पत्तीस्थाने पडताळणी.
- गप्पीमासे पैदास केंद्र तपासणी.
- मजूर शिबीरांना आठवडी भेट.
- मच्छरदाणी वाटप.

**२) साथरोग नियंत्रण]**

- हगवण, अतिसार, काविळ, विषमज्वर,मेंदूज्वर,घटसर्प,गोवर ई.साथीवर नियंत्रण व लक्ष्य.
- उद्रेकाच्या प्रसंगी त्वरीत कार्यवाहि,उद्रेक नियंत्रण पथक तयार करणे.विहिरी निर्जंतुकीकरण,ओ.टी.पर्यवेक्षण,दूषित पाणी नमुन्याअनुषंगाने कार्यवाही ग्रामपंचासत भेटी,ब्लिचींग पावडर साठा तपासणी.
- प्रतिबंधनात्मक कार्यवाही व वरिष्ठांना आवश्यक ती माहिती सादर करणे.
- उद्रेक होऊ नये म्हणून साथरोगविषयक आरोग्य शिक्षण.
- रेबिज प्रतिबंधन]लावारिस कुत्यांचा बंदोबस्त.

**३)राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम-**

- मोतिबिंदू रुग्णांची यादी तयार करुन घेणे व शिबीर नियोजन.
- शाळेत जाणा-या सर्व मुलांची द्यृष्टीदोष,तिरळेपणा व इतर नंत्र आजारांकरिता तपासणी होईल याची खात्री करणे व त्यांना उपचार देण्याची व्यवस्था करणे.

**४)राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम-**

- निदान व नियमित उपचार
- संशयित रुग्णांचा त्वचानमुना घेणे व तपासणीसाठी पाठवणे.

**५)राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम-**

- नियमित औषधोपचार
- आरोग्य कर्मचा-यांकडून घेतलेले थुंकी नमुन्याची पडताळणी.

**६)प्रजनन व बालआरोग्य**

**६.१-सार्वत्रिक लसटोचणी कार्यक्रम**

- लसीकरणासाठी लागणारा साधनसामुग्रीचा साठा अद्ययावत ठेवणे.
- पल्स पोलिओ लसीकरण-
- लसीकरण गावाचे पर्यवेक्षण

**६.२-क्षारसंजीवनी उपचार**

- अतिसाराच्या रुग्णांना क्षारसंजीवनी उपचार
- आरोग्य सेवक स्त्री पुरुष यांना क्षारसंजीवनीचा पुरवठा करणे

**६.३-शालेय आरोग्य कार्यक्रम**

- लसीकरणासाठी आरोग्य कर्मचा-यांना सहाय्य.
- विद्यार्थ्यांना आरोग्य शिक्षण.

**६.४- कुटुंब कल्याण**

- कुटुंब पाहणीचे वेळी पर्यवेक्षण व गोषवारे काढणे.
- प्रतिसाद न देणा-या जोडप्यांचे मतपरिवर्तन.
- निरोध डेपोहोल्डर-नियमित साधनपुरवठा.
- कुटुंब नियोजन शिबीरे आयोजित करण्यासाठी सहाय्य.
- लाभार्थींचा पाठपुरावा व पर्यवेक्षण.
- पुरुषांचा कार्यक्रमात सहभाग वाढवणेसाठी प्रयत्न.

**६.५- उपकेंद्र नियोजन व मार्गदर्शन**

- आरोग्य सेविकेला उपकेंद्र नियोजन आराखडा तयार करणेसाठी आवश्यक मार्गदर्शन व मदत.
- पुरुष आरोग्य कर्मचा-याचा सहभाग निश्चित करणे.
- लाभार्थ्यांच्या गरजा व निश्चितीसाठी मदत व मार्गदर्शन.

**६.६- लोकसंख्या धोरण व आरोग्य शिक्षण-**

- लोकसंख्या धोरणाची उद्दिष्टे व प्रमुख बाबी
- प्रस्तावित उपाययोजनांची माहिती
- सेवांची उपलब्धता व गुणवत्ता सुधारणे.
- विविध क्षेत्रांचा व विभागांचा सहभाग.

**६.७- प्रजनन मार्ग जंतुसंसर्ग - पुरुष रुग्णांसाठी निदान व उपचार.**

- प्रजनन मार्ग जंतुसंसर्गाचे परिणाम व निदान.
- प्रतिबंधनात्मक उपाययोजना .
- उपचार व पध्दती.

**६.८- लैंगिक शिक्षण-**

- किशोरवयीन मुलामुलींना लैंगिक शिक्षण.
- सुरक्षात्मक उपाययोजना.
- दुष्परिणामांची जाणीव करुन देणे.

**फ) जीवनविषयक आकडेवारी**

- आरोग्य कर्मचा-यांनी गोळा केलेल्या जन्म मृत्युच्या माहितीचे एकत्रिकरण.
- एम.आय.एस. चालू असलेल्या प्रा.आ.केंद्रतील कार्यावर देखरेख व गळती.
- ग्रामपंचायतमध्ये केल्या जाणा-या जन्म मृत्यूनोंदीबाबत सर्वेक्षण व पडताळणी.
- अहवाल संकलन.

**ग) परिसर स्वच्छता**

- सुरक्षित पाणी पुरवठा.
- शोषखड्डा,परसबाग,खतखड्डे,आरोग्यदायी संडास,बिनधुराची चूल तयार करण्यासाठी जनतेला प्रोत्साहन व मार्गदर्शन.
- पाण्याच्या निर्जंतुककिरणाबाबत ओ.टी.टेस्ट.
- पाणी नमुने गोळा करुन चाचणीसाठी प्रयोगशाळेसाठी पाठवणे व अहवाल ग्रामपंचायतीकडे पाठवणे व पाठपुरावा करणे.
- पाणी शुध्दीकरणासाठी ग्रामपंचायत कर्मचारी प्रशिक्षण.
- दूषित पाणी नमुना असलेल्या स्त्रोताकरिता योग्य उपाययोजना.

**घ) प्रथमोपचार व किरकोळ आजार व संदर्भसेवा**

- ➢ आरोग्य सेवकाकडे प्रथमोपचार व किरकोळ आजारांच्या उपचारासाठी लागणारे सर्व साहित्य असल्याची खात्री.
- ➢ आरोग्य सेवकाचे निरंतर प्रशिक्षण.
- ➢ किरकोळ आजार,उपचार व अपघात प्रकरणी प्रथमोपचार व संदर्भसेवा.
- ➢ आरोग्य कर्मचा-यांकडून संदर्भित रुग्णांवर योग्य उपचार व आवश्यक तेथे पुढील संदर्भसेवेसाठी रुग्ण रवानगी.

**न) आयोडीन न्युनता विकार कार्यक्रम.**

- ➢ आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे विकार/आजार आणि आयोडीनयुक्त मिठाचा आहारातील वापराबाबत लोकांना आरोग्य शिक्षण देणे.
- ➢ वापरण्यात येणारे मिठाचे नमुने आयोडीनचे प्रमाण तपासण्याकरिता प्रयोगशाळेकडे पाठविणे.

**प) आरोग्य शिक्षण,प्रशिक्षण संप्रेषण व समोपदेशन.**

- ➢ महत्वाच्या कार्यक्रमात गटसभेचे आयोजन.
- ➢ साथरोग,परिसर स्वच्छता,प्रजनन बालकार्यक्रम माहिती व संप्रेषण कार्यक्रमाचे आयोजन
- ➢ शालेय भेटीद्वारे आरोग्य शिक्षण
- ➢ यात्रासमारंभ इत्यादीचेवेळी प्रदर्शनीचे आयोजन.
- ➢ पुरुष आरोग्य कर्मचा-यांच्या मदतीने स्थानिक नेत्यांचे प्रशिक्षण.
- ➢ आरोग्य कर्मचा-यांचे प्रशिक्षण.

**१) समोपदेशन सत्रांचे आयोजन.**

- ➢ कुटुंब नियोजन साधने वापरण्यासाठी
- ➢ लैंगिक मार्गजंतुसंसर्ग.
- ➢ लैंगिक आजार व वैकल्ये.
- ➢ एच.आय.व्ही./एड्स.

क्ष) अंगणवाडी तसेच आश्रमशाळा भेट.